आग्निया बार्तो

अडाणी अस्वल

आग्निया बार्तो

अडाणी अस्वल

अनुवादः अनिल हवालदार
चित्रकारः व्लादीमिर सुतेयेव

राद्रुगा प्रकाशन
मॉस्को

लोकवाङ्मय गृह प्रा. लि.
मुंबई

होता एका अस्वलीला
मुलगा छोटा पिटुकला.
बाळाचे होते रूप
आईची नक्कल हुबेहूब.

अस्वली निजायची
झाडाच्या सावलीत.
मुलगासुद्धा निजायचा,
आईच्या कुशीत.

तो धपकन पडायचा,
"बिच्चारा!" आई कळवळायची.
आख्ख्या अभयारण्यात नाही सापडायचा
एवढा अस्वलबाळ शहाणा!

ह्या बाळाला शिस्तीची
मुळीच नव्हती चाड !
घाणेरड्या हातांनी ओरबाडून
गट्ट केले मधाला, खादाड !

आईने भरला सज्जड दम :
खादाडपणा असा नसतो करायचा !
तरी बाळाने लावला सपाटा
मधाला गपागप हादडायचा !

बाळाची सेवा करता करता
आई आली मेटाकुटीला :
आंघोळ घालून चाटता चाटता
तिचा दम पुरता उखडला.

जेव्हां बोलतात आई-बाबा –
बाळ खुपसतो मध्येच तोंड
मोठी अस्वले बोलतात तेव्हा
बाळाने खुपसायचे नसते तोंड!

बाळ घरी आला
स्वतःच प्रथम घुसला –
वडीलधाऱ्या अस्वलाला
त्याने रस्ता नाही दिला.



काल कुठे गायब झाला
शोधून शोधून आई दमली!
मळक्या अंगाने बाळ आलं
आईला सांगतोय खड्डयात पडला!

शिस्त नाही मुळीच त्याला!
सारी रात्र कोकलतोय,
झोपेच्या नावाने ठणाठणा!

आईला तो वेडी करणार!
इथे कुणाची शक्ती पुरणार?
पाहुणा म्हणून बाळ गेला –
मालकिणीलाच जोरात चावला!

अस्वलबाळांना शेजारच्या
पाडले फांद्यांवरून झाडाच्या.

गरीब बिचारी अस्वली
तीन दिवस खूप झुरली
तीन दिवस म्हणत राहिली :

"असं कसं वाढवलं बाळाला
मूर्खाला अति लाडावला!"

सल्ला नवऱ्याचा घ्यायला
गेली अस्वली :
"बाळ सर्वांत वाईट निघाला
काय करायचे आपण?"

"भलेबुरे समजत नाही त्याला –
उध्वस्त केली घरटी पक्ष्यांची,
सतत भांडायची आवड त्याला
चव्हाटयावर मारामाऱ्या करायची!"

गरजला बाप अस्वलाचा :
"बायको, इथं संबंध काय माझा?

बाळाला वळण लावण्याचा
उद्योग केवळ तुझा!
मुलगा ही आईची चिंता
नाही तर तू कसली माता?"

पण गोष्टी पोचल्या एवढ्या थराला
की खुद्द अस्वलावर
पोटच्या मुलाने
पंजा उगारला !

रागावलेल्या बापाने
पोरट्याची तिंबली कणीक.
(दिवट्या पोराचे उद्योग बघून
बापाला वागावे लागले कडक !)

अस्वली विव्हळू लागली :
"हात नका लावू माझ्या बाळाला :
मुलांना मारहाण केलीत
तर दुखते माझ्या काळजाला ..."

अस्वलांच्या कुटुंबात स्थिती केविलवाणी
बाळ वाढतोय अडाणी !

ऐकून माहीत आहे मला ,
आणि लोक म्हणतात ,
असली अस्वलबाळे
मुलांमध्येही सापडतात !

Агния Барто
МЕДВЕЖОНОК-НЕВЕЖА
На языке маратхи

A. Barto
THE BEAR-CUB WITH BAD MANNERS
In Marathi

सोविएत संघात मुद्रित

© मराठी अनुवाद, रादुगा प्रकाशन, १९८८

ISBN 5-05-001898-6

ISBN 5-05-001898-6